संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी , अकोला द्वारा संचालित

श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

# नियमित कार्यक्रम अहवाल

सत्र २०२० –२१

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित**

# श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

## सत्र : २०२०-२०२१

| अ. क्र.<br>Sr.no. | घटक<br>(Particulars) | पान क्र.<br>Page no. |
|---|---|---|
| १. | नियमित लेखे | |
| २. | उपयोगिता प्रमाणपत्र | |
| ३. | पावत्या व देयक खाते<br>(Receipts & Payment Account for the year) | |
| ४. | रा.से.यो. विद्यार्थी यादी | |
| ५. | रा.से.यो. नियमित कार्यक्रमाचा निबंधात्मक अहवाल<br>(फक्त २ पान/ Only 2 pages) | |
| ६. | रा.से.यो. नियमित कार्यक्रम आर्थिक मुल्यांकन आणि नियमित कार्यक्रमा अंतर्गत राबवीलेले अभिनव प्रकल्प (w- २३५९ तो w- २३६३) | |
| ७ | वृत्तपत्र कात्रणे | |
| ८ | छायाचित्रे | |

दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित

# श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

# राष्ट्रीय सेवा योजना नियमित अहवाल २०२०-२१

**वृक्षारोपण (Greenery):** जुलै २०२०

१२ जुलै २०२० रोजी वन कार्यालय अकोला यांच्या सहकार्याने वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड करून व रोपट्यांचे वितरण करणात आले. हे कार्यक्रम शिवापूर, अकोला (वनमहोत्सव) येथे करण्यात आले. एनएसएस को-ऑर्डिनेटरसह एनएसएस स्वयंसेवकांनी शिवापूर परिसरामध्ये वनमहोत्सव अंतर्गत संस्थेला वाटप केलेले सुमारे 30 झाडे लावली. एन.एस.एस. टीमने वन कार्यालय अकोला यांच्या सहकार्याने सामाजिक अंतर ठेवून आणि खबरदारीच्या उपाययोजना करून जवळपास 30 झाडे लावली. डॉ. रश्मी जोशी यांच्यासह स्वयंसेवक आणि वन अधिकारी श्री ओवे सर, श्री गिते, श्री गोंदाणे यांनी वृक्षारोपण अभियानाच्या यशस्विते करिता प्रयत्न केले.

http://rltsc.edu.in/2020/07/14/tree-plantation-by-nss/

**दि. २६/०७/२० कारगिल विजय दिवस/ सर्जिकल स्ट्राईक:**

कोविड काळात सोशिअल मिडिया च्या सहहाय्याने कारगिल दिवस बद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली तसेच मा.प्राचार्य आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी ह्यांनी शहिदांना आदरांजली वाहिली.

**दि. ०९/०८/२०२० ऑगस्ट क्रांती दिन**

रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर व डॉ. समाधान मुंडे ह्यांनी क्रांती दिनाबद्दल अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. व्ही डी नानोटी ह्यांनी गांधीजींच्या भारत छोडो आंदोलन बद्दल विद्यार्थ्यांना सांगितले जेणेकरून महात्माजींचे राष्ट्रप्रेम, अहिंसा, त्याग ह्या सर्व गुणांवर प्रकाश टाकलं. विद्यार्थ्यांनी २ मिनिटांचा मौन पाळून त्यांना श्रद्धांजली वाहिली. विद्यार्थ्यांना आपल्या भाषणात डॉ. जोशी ह्यांनी क्रांती दिनाचे महत्व सांगितले, “मुंबईत भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींनी केलेली 'छोडो भारत' ची गर्जना आणि दिलेला "करेंगे या मरेंगे" हा मंत्र नऊ ऑगस्टच्या दिवशी संपूर्ण देशात पसरला होता. त्यामुळे या दिवशी क्रांतीची ज्योतच जणू पेटली. देशभरात ब्रिटिश सत्तेला हाकलून लावण्यासाठी आंदोलनांना सुरवात झाली.”

**ऑगस्ट स्वच्छं भारत अभियान पंधरवडा (दि. १/०८/२०२० ते १५/०८/२०२० )**

**महाविद्यालयात आरोग्य व स्वच्छते विषयी अंमलबजावणी:**

**दि. १२ ऑगस्ट २०२०**, विद्यापीठातील निर्देशानुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरु होती. कोरोना काळातील ह्या प्रवेश प्रक्रीये दरम्यान कोणी कोरोना बाधित न होता कामानये म्हणून रासेयो विभागाकडून सावधगिरी म्हणून महाविद्यालयातील परिसरात कोरोना महामारीपासून बचाव करण्याकरिता विद्यार्थी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता “sanitizer pedal stand” ठेवण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वी.डी. नानोटी ह्यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करून महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळ हे sanitizer pedal stand ठेवण्यात आले. विविध ठिकाणी “NO MASK- NO ENTRY” चे फलक लावून प्रवेश द्वारावरच आत येतांना, प्रत्येकाला मास्क वापरणे बंधनकारक करण्यात आले. विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये कोरोन विषयी जनजागृती करण्यात आली.

**दि. १३ ऑगस्ट २०२० ला निबंध स्पर्धा व पोस्टर स्पर्धेचे आयोजन**

दि. १३ ऑगस्ट २०२० रोजी प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या रा.से.यो. चमू आणि भाषा विभागा कडून विविध स्पर्धांचे online आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये वर्ग ९ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा आणि पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. निबंध व पोस्टर ह्या दोन्ही स्पर्धा “गंदगी मुक्त मेरा गाव” ह्या विषयावर आधारित होती. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रातिसाद लाभला. काही पोस्टर्स आणि काही निबंधाचे फोटो खाली दिलेगेले आहे. विद्यार्थ्यांनी खूप सुंदर प्रकारे “**गंदगी मुक्त मेरा गाव**”, हा कसा असावा व त्याकरिता कोणते प्रयत्न करावे ह्याबद्दल माहिती सादर केली. रासेयो च्या कार्य. अधि. डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे आणि भाषा विभागचे सहायक प्राध्यापक श्री. अरुण खेडकर ह्यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धांचे आयोजन केले गेले. सर्व स्पर्धकांपैकी प्रत्येकी सर्वश्रेष्ठ तीन विद्यार्थ्यांची दोन्ही स्पर्धेतून निवड केल्या गेली. महाविद्यालाच्या प्राचार्यांनी ह्या विविध स्वच्छते विषयी घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचे कौतुक केले व असेच आयोजन निरंतर समाजात जनजागृती करण्याकरिता करत राहावे अशे प्रतिपादन केले. मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडले.

**दि.१४ ऑगस्ट २०२०**: श्री रालतो च्या रासेयो चमूने दत्तक ग्राम येथे **दि.१४ ऑगस्ट २०२०** रोजी रोपटयांचे वितरण केले व गावातील विविध ठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविला. **दि. १५ ऑगस्ट २०२०** ला महविद्यालय परिसरातिल रोपवाटिकेत, मान. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी व IQAC समन्वयक डॉ. आर. एल. राहाटगांवकर ह्यांच्या हस्ते

वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण करिता महाविद्यालयातील वरिष्ट प्राध्यापिका मा.शैलजा अंधारे, प्रा. वैशाली बडगुजर, प्रा. सुजाता ताडम, डॉ. अंजली सांगोले, डॉ. सुशील नागराळे व इतर शिषक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे ह्यांनी कार्यक्रमाच्या यशस्विते करिता प्रयत्न केल.

**दि. १५/०८/२०२० दत्तक ग्राम अपोती खुर्द (आपातापा) येथे आरोग्यवर्धिनी केंद्र आणि ग्राम-पंचायत कार्यालयात करोना प्रादुर्भाव पासून मुक्त करण्याकरिता रासेयो कडून निर्जंतुकीकरण करण्यात आले:**

करोना महामारीच्या काळात स्वतःचे व इतरांचे बचाव करण्याकरिता दत्तकग्राम अपोती खुर्द येथील, प्राथमिक स्वास्थ्य केंद्र आपातापा व ग्रामपंचायत आपातापा ह्या दोन्ही ठिकाणी श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयोच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व काही स्वयंसेवकांकडून सेनिटाईझेषन करण्यात आले. PHC येथे दत्तक ग्रामचे उपसरपंच डॉ. उमेश बोपटे PHC Co-Ordinator डॉ. हर्षवर्धन बर्डे व Pharmacist आठवले मेडम ह्यांचे सहकार्य लाभले. रासेयोच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो स्वयंसेवक उज्वल पटेल, हर्शल गिरम ह्यांनी हे कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केले व कोविड योद्ध म्हणून दत्तक ग्राम येथे कार्य केले.

श्री रालतो च्या रासेयो चमूने दत्तक ग्राम येथे **दि.१४ ऑगस्ट २०२०** रोजी रोपटयांचे वितरण केले व गावातील विविध ठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविला. **दि. १५ ऑगस्ट २०२०** ला महविद्यालय परिसरातिल रोपवाटिकेत, मान. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी व IQAC समन्वयक डॉ. आर. एल. राहाटगांवकर ह्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण करिता महाविद्यालयातील वरिष्ट प्राध्यापिका मा.शैलजा अंधारे, प्रा. वैशाली बडगुजर, प्रा. सुजाता ताडम, डॉ. अंजली सांगोले, डॉ. सुशील नागराळे व इतर शिषक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे ह्यांनी कार्यक्रमाच्या यशस्विते करिता प्रयत्न केल.

**दि. ०५/०९/२०२० श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे शिक्षक दिन साजरा:**

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात ५/०९/२०२० रोजी डॉ. सर्वपल्ली राधाक्रीष्णन ह्यांच्या जयंतीला शिक्षक दिन साजरा केला गेला. महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. नानोटी हे होते व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. विभाग प्रमुखांपैकी डॉ. पूनम अग्रवाल, ज्येष्ठ

प्राध्यापक डॉ.यु.के. भालेकर, डॉ. चव्हाण, डॉ. एस. एम. नागराळे, डॉ. चंद्रवंशी, प्राध्यापिका वैशाली बडगुजर व प्राध्यापिका सुजाता ताडम व सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. COVID-19 च्या काळात मास्क आणि sanitizers च्या माध्यमातून हे कार्यक्रम घेण्यात आले.

**दि.२४/०९/२०२० 'राष्ट्रीय सेवा योजना" स्थापना दिवस**

राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे, हे आहे. महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करणे, क्रीडांगणे तयार करणे, ग्रामीण विभागातील रस्ते बांधणे, प्रौढ शिक्षण, गलिच्छ वस्त्यांची सफाई, प्रथमोपचार, नागरी संरक्षण इ. कार्यक्रमांचा या योजनेत समावेश आहे. हि जाणीव निर्माण करण्या करीताच राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली. रासेयो चे आराध्य दैवत संत गाडगे महाराज ह्यांच्या प्रतिमेला वंदन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मान. डॉ. नानोटी हे होते. कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी कार्याक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. नानोटी ह्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रासेयो च्या चिन्हाबद्दल माहिती सांगितली. कार्यक्रमाचे आभार डॉ.समाधान मुंडे व सह कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जैस्वाल ह्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता अथक परिश्रम केले.

**दि.२/१०/२०२० महात्मा गांधी जयंती**:

राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यंच्या जयंतीचे औचित्य साधून आणि COVID-१९ च्या मार्गदर्शक नियमांचे पालन करून, मास्क्चे वापर, सामाजिक अंतर ठेवून श्री रा.ल.तो. महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने स्वच्छता दुतांचे सत्कार केले व त्यांना मास्क चे आणि sanitizer प्रदान केले. सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्य ह्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहिली. स्वच्छं भारत स्वस्थ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता दूतांनी महाविद्यालयाचे परिसर, वर्ग खोल्या स्वच्छ केल्या व संपूर्ण परिसर ल sanitize करण्यात आले.

**15/10/20 रोजी एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा NEP 2020 (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण):**

श्री आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स अकोलाच्या एन.एस.एस युनिट आणि IQAC ने भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या सौजन्याने NEP 2020 (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- उच्च शैक्षणिक संस्थांसाठी सामाजिक उद्योजकता निर्माण करणे) ह्या अनुषंगाने एक दिवसीय आभासी कार्यशाळेचे आयोजन केले. ह्या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योजक्ता कशी निर्माण करावी व विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याकरिता एक दिवसीय skill Development कार्यशाळेचे आयोजन रासेयो च्या कार्य.अधि. डॉ.रश्मी जोशी सावलकर ह्यांनी केले. कार्यशाळेसाठी रिसोर्स पर्सन म्हणून श्री अभिषेक रंजन (MGNCRE, MoE) हे लाभले होते. एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी सावळकर यांनी मा. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नॅनोटी यांच्या मार्गदर्शनाखाली अशा ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्रयत्न केले. गुगल मीटवर सकाळी 10:30 ते दुपारी 12:30 या कालावधीत आभासी कार्यशाळा घेण्यात आली. पूर्ण सत्र अतिशय माहितीपूर्ण आणि संवादात्मक होते.

सहभागींनी चर्चा केली आणि त्यांच्या कल्पना संसाधन व्यक्तीशी शेअर केल्या. या स्पर्धेसाठी अनेक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. नोंदणीकृत विद्यार्थ्यांना 15 दिवसात आपल्या कल्पना आणि सादरीकरणे सादर करण्याची सूचना देण्यात आली. IQAC चे समन्वयक डॉ. आर. एल. रहाटगावकर यांनी सहकार्य दिल्याबद्दल संपूर्ण टीमने त्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या प्रचंड प्रतिसादामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला. महाविद्यालयाच्या SESREC कमिटीची संपूर्ण टीम, डॉ समाधान मुंडे, श्री शैलेश जैस्वाल आणि कु.सोनाली गावंडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

## नोव्हेंबर २०२० श्री रालतो महाविद्यालयाला रासेयो चे सत्र २०१९-२० चे ६ पुरस्कार जाहीर:

१. सत्र २०१९-२० चे उत्कृष्ठ रासेयो एकक श्री रालतो विज्ञान महाविद्यालय व कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर (शासन निर्णय).

२. सत्र २०१९-२० चे उत्कृष्ठ रासेयो एकक श्री रालतो विज्ञान महाविद्यालय व कार्यक्रम अधिकारी महिला, डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांना विद्यापीठस्तरीय पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये प्रशस्ती पत्र व स्मृतीचिन्ह देऊन मा. कुलगुरू डॉ. मुर्लीधर चांदेकर ह्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

३. सत्र २०१९-२० चे उत्कृष्ठ रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी, डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांना जिल्हा स्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले.

४. प्रसाद गुल्हाने ह्या विद्यार्थ्याला उत्कृष्ट स्वयंसेवक जिल्हा स्तरीय आणि विद्यापीठ स्तरीय असे दोन पुरस्काराने सन्मानित केले.

५. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. वी. डी. नानोटी व डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांना जिल्हा स्तरीय पुरस्काराने सन्मानित केले.

### २६ नोव्हेंबर २०२०: भारतीय संविधान दिवस:

दि. २६/११/२०१९ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात संविधान दिवस साजरा केला गेला. विद्यार्थ्यांना संविधान बद्दल माहिती देऊन शपथ देण्यात आली, कि संविधानात दिलेल्या सर्व गोष्टींचे मान राखून त्यांचे योग्य पालन करणार. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. नानोटी होते. विद्यार्त्यांसाठी लायब्ररी मध्ये भारतीय संविधानाचे पुस्तक वचन करिता उपलब्ध केले गेले.

### २८ नोव्हेंबर २०२०: महात्मा ज्योतिबा फुले ह्यांची पुण्यतिथी:

लोकांमध्ये शिक्षणाचे बी रोवणारे, क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले ह्यांच्या पुण्यतिथी निमित्त्या अभिवादन कार्यक्रम गेण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याबद्दल माहिती करून देण्यात आली.

**संविधान साप्ताह साजरा (२४ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२०)**

२६ नोव्हेंबर ला रासेयो पथकाद्वारे संविधान दिवस साजरा केला गेला , संविधान प्रीआम्बलचे वाचन करण्यात आले. संविधान चा मान राखण्या बद्दल शपथ देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

**१ डिसेम्बर २०२० जागतिक एड्स दिवस- रेड रिबन क्लब ची स्थापना**

१ डिसेम्बर २०२० जागतिक एड्स दिवसचे औचित्य साधून "रेड रिबन क्लब" ची स्थापना व गठन करण्यात आले. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. वी.डी.नानोटी हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना समाजात एड्स बद्दल जनजागृती करावयास उद्बोधित केले.

**रक्तदान शिबीर (दि. २४/१२/२०२०)**

आपल्या देशात मागील १ वर्षापासून COVID-19 चा प्रादुर्भाव असल्यामुळे राज्यात रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात निर्माण झाला होता. राज्य सरकारने केलेल्या आव्हानाला सरसावून **राष्ट्रीय सेवा योजनेने** हे आव्हान स्वीकारले व त्याला यशस्वीरीत्या पूर्णत्वास आणले. रा.से.यो. च्या माध्यमातून रक्तदान शिबिरांचे आयोजन करून रक्ताचा साठा निर्माण करण्यात आला.. **"रक्तदान-श्रेष्ठदान"** या संकल्पनेतून हे सामाजिक कर्तव्य पार पाडण्याकरिता सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाचे रा.से.यो. समन्वयक मा. डॉ. राजेश बुरंगे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व रा.से.यो. स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, क्षेत्रीय समन्वयक व जिल्हा समन्वयक ह्यांनी एकजुटीने हे आव्हान स्वीकारले.

**"चला तर मग रक्तदान करूया.... सामाजिक बांधिलकी जपूया"**

हि भावना मनात बाळगून दिनांक २४/१२/२० रोजी श्री रा.ल.तो विज्ञान महाविद्यालयातिल रासेयो पथकाद्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्वर्गीय प्राचार्य श्री म. गो. जोशी, ह्यांच्या स्मृती प्रीत्यर्थ रक्तदान शिबिराचे प्रत्येक वर्षी २४ डिसेंबर ला आयोजन करण्यात येते. ह्या वर्षी कोविड-१९ महामारीचा प्रादुर्भाव असतांना सुद्धा सामाजिक अंतर ठेवून व मास्क चे वापर करून हे सामाजिक कर्तव्य यशस्वी रित्या पार पाडले गेले. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करत **३१ रक्तदात्यांनी** ह्या शिबिरात रक्तदान केले.

महाविद्यालयातील रा.से.यो च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर, डॉ. समाधान मुंडे, क्षेत्रिय सम. व DMC समन्वयक डॉ. सुधीर कोह्चाले ह्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. महाविद्यालयातील NCC व Sports विभाग सुद्धा ह्या सामाजिक कार्यात सहभागी झाले होते. प्रत्येकाने आपले कर्तव्य अचूक रित्या पार पाडण्याकरिता प्रयत्न केले. अकोला Govt. Medical College रक्तपेढी च्या संयुक्त विद्यमाने ह्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ.विजय नानोटी, प्रमुख पाहुणे श्री. अनुप गोसावी, रक्त संक्रमण अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला आणि वैद्यकीय समुपदेशक तायडे मॅडम ह्यांची विशेष उपस्थिती लाभली. सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या रा.से.यो. विभागाकडून दिलेल्या सूचनांचे पालन करत रक्तदान शिबिराकरिता बॅनर तयार करण्यात आले व स्नेहानुबंध कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. बस स्थानक, महाविद्यालयाच्या दर्शनी भागात व विविध ठिकाणी

रक्तदान शिबिराचे बॅनर लावून तसेच सोशिअल मिडिया च्या माध्यमातून प्रचार व प्रसार केला व अकोलेकारांना रक्तदान करण्याचे आव्हान करण्यात आले. २४ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ९ ते ११ ह्या कालावधीत महाविद्यालयाच्या सभागृहात हे कार्यक्रम यशस्वीरीत्या घेण्यात आले. NSS व DMC आणि इतर विद्यार्थ्यांनी, स्वयंसेवकांनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी शिस्तीचे पालन करून रक्तदान केले. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी ह्यांचे मार्गदर्शन लाभले व त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्व रक्तदात्यांचे कौतुक करून आभार व्यक्त केले. CORONA काळात, मनात भीती ना बाळगता सामाजिक कर्तव्य पूर्ण करून सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचे काम पुनःश्च **N.S.S.** ने सिध्द करून **NOT ME BUT YOU** ह्या ब्रीद वाक्याला बळकटी निर्माण करण्याचे प्रयत्न केले आहे.

**युवा-दिन साजरा (१२/०१/२०२१):**

दि. १२/०१/२०२१ रोजी श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो चमूने स्वामी विवेकानंद ह्यांच्या जयंती निमित्य म्हणजेच **युवा-दिन** तसेच राष्ट्रमाता जीजाऊ जयंती ला .....या प्रसंगी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री गोपाल वरोकार व प्रा कोहोचळे, प्रा मुंडे, प्रा जोशी मॅडम,डॉ उमेश.भालेकर व बहूसंख्य (एन एस एस) राष्ट्रीय सेवा योजना. सामाजिक अंतर ठेऊन अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले.

**"रस्ता सुरक्षा सप्ताह"**

"**रस्ता सुरक्षा सप्ताह"** दर वर्षी जानेवारी महिन्यात साजरा केला जातो, पण २०२१ ला **"रस्ता सुरक्षा महिना" (१८ जानेवारी ते १७ फेब्रुवारी)** म्हणून साजरा करण्यात आला. श्री रा ल तो विज्ञान महाविद्यालय अकोलाचे रासेयो पथक व उप प्रादेशिक परीवाहन कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा साप्ताहाचे आयोजन करण्यात आले. दि.०४/०२/२०२१ रोजी अकोला शहरातील विविध ठिकाणी बस स्टॅंड, खुले नाट्य गृह, जिल्हाधिकारी कार्यालय व इतर ठिकाणी पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे कार्य रासेयो च्या विद्यार्थ्यांनी केले। महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी, मा. विनोद जिचकार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मा. गोपाल वरोकार, सहाय्यक प्रादेशिक वाहन अधिकारी , मा. प्रफुल्ल मेश्राम मोटार वाहन निरीक्षक ह्यांच्या विशेष उपस्थितीत हे आयोजन करण्यात आले. कोविद-१९ च्या काळात सामाजिक अंतर ठेवून व मास्क चे वापर करून विविध ठिकाणी पथनाट्याचे आयोजन केल्या गेले. डॉ. रश्मी जोशी सावलकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि डॉ सुधीर कोहचाळे रासेयो क्षेत्रीय समन्वयक, यांच्या उपस्थितीत विविध ठिकाणी रासेयो स्वयंसेवकांनी पथ नाट्याच्या माध्यमातून जनजागृती केली. डॉ समाधान मुंड, कार्य.अधि., प्रा. शैलेश जयस्वाल व प्रा. सोनाली गवांदे सह कार्य.अधि. ह्यांनी

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. मा. प्राचार्य डॉ. नानोटी ह्यांनी उप-प्रादेशिक परिवहन विभागाचे आभार व्यक्त केले.

https://youtu.be/lUsCJnk6JcE city news link रस्ता सुरक्षा साप्ताह ०४/०१/२१

**https://youtu.be/Zsp5iQQ_Zbw .... पथनाट्य link**

**https://youtu.be/dKQeWt2zRRU Poster Competition link.**

एन.एस.एस. युनिट श्री. आर.एल.टी विज्ञान महाविद्यालय, अकोलाच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांनीरस्ता सुरक्षासंबंधी online प्रश्नमंजुषाचे आयोजन केले, यामध्ये 300 हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि सुमारे 10 विद्यार्थ्यांनी त्यात पूर्ण गुण मिळवले. रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त पोस्टर स्पर्धेच्या विजेत्यांना वाहतूक कार्यालय अकोल्याकडून प्रशस्ती पत्र देऊन निकाल जाहीर करण्यात आला.

**पहिली विजेता: वैष्णवी म्हैसने,**

**दुसरी विजेता: साक्षी लमेघ आणि**

**तिसरी विजेता: प्रेरणा पवार**

**** Shri RLT College of Science, Akola. ****

**National Service Scheme**

**List of Participants in Quiz Competition arranged on occasion of "Road Safety Week-2021"**

## WINNERS Of THE QUIZ COMPETITION:

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Rutik S Ghaywat | B.Sc III, Stood $1^{st}$ | Time Span: 09:13:33 mins |
| 2. | Vaishnavi P Chavhan, | B.Sc II/ P4, stood $2^{nd}$ | Time Span: 10:11:02 mins |
| 3. | Rutuja Santosh Dandale | B.Sc I/ B5 stood $3^{rd}$ | Time Span: 12:38:29 mins |

**दि. १९/०२/२०२१ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली:**

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महविद्यालायाचे प्राचार्य मा. डॉ. व्ही. डी. नानोटी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे, नॉन टिचिंग प्रमुख श्री चंद्रकांत अहिरकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आजच्या युवा पिढीने शिवाजी महाराजांचे चरित्र वाचून आपले व्यक्तिमत्व विकास करावे असे आह्वान केले. कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी अगदी शिवमय वातावरणात रासेयो कार्य. अधि. डॉ. समाधान मुंडे ह्यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता केली.

**२३ फेब्रुवारी २०२१ संत गाडगे महाराज जयंती:**

रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे व डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वी.डी. नानोटी ह्यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगे महाराज ह्यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेवून सोसीअल मिडिया च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे उद्बोधन करण्यात आले.

**दि. ३१/०३/२०२१ सत्रांत सभा सं.गा.बा.विद्यापीठ, अमरावती.**

रासेयो ची सत्रांत सभा दि. ०४/०७/१९ घेण्यात आली. या सभेला श्री रालतो विज्ञान महाविद्यालाचे प्राचार्य माननीय डॉ.व्ही.डी. नानोटी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे, क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोह्चाले ह्यांची उपस्थिती होती. सभेला माननीय रासेयो सं.गा.बा.अ.वि. चे समन्वयक डॉ. राजेश बुरंगे हे होते.

**दि. १८/५/२१ रोजी SAP (स्वच्छता एक्शन प्लान, MGNCRE) प्रस्ताव "One District One Green Champion Award" करिता पाठविण्यात आले:**

डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्या महाविद्यालयाच्या SAP कमिटीच्या Nodal ऑफिसर म्हणून "One District One Green Champion Award" by Mahatma Gandhi National Council for Rural Education (MGNCRE), Govt. of India करिता प्रस्ताव पाठविले होते. प्रस्तावाचे निकाल ५ जून २०२१, जागतिक पर्यावरण दिवसाला घोषित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप ५००० रोख व प्रशस्ती पत्र असे आहे. श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाने हे पुरस्कार मिळविले व कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश संपादन केले.

**दि. २३/५/२१: समन्वयो का समन्वय, आओ नदी को जाने (NGO):**

जल बिरादरी ह्या राष्ट्रीय संघटनेच्या core team आणि **Samanvayon ka Samanvay: Bharat Punarnirman Abhiyaan** मध्ये सहभागी होऊन डॉ. रश्मी जोशी ह्यांनी **College to Village** ह्या विषयावर राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत त्यांनी केलेल्या कार्याचे व्याख्यान दिले. तापी नदी करिता core team मध्ये सुद्धा सहभागी झाले आहे.

https://www.facebook.com/112396824261176/videos/523700651980042/

# वृत्तपत्र कात्रणे

मातृभूमि

# अकोला सिटी

बाजोरीया ग्रुप

अकोला, रविवार दि. २७ डिसेंबर २०२०

स्मृतिदिन सोहळा | स्व. प्राचार्य म.गो. जोशी यांना अभिवादन

## रक्तदान शिबिरात ३१ दात्यांनी केले रक्तदान

मातृभूमि वृत्तसेवा

अकोला दि. २६ :

[illegible]



'पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पारितोषिक प्राप्त विद्यार्थिनी कल्पना मनसुटे हिने मनोगत व्यक्त करताना महाविद्यालय व तिच्या पालकांप्रति ऋण व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात अॅड. मोतीसिंह मोहता यांनी आई-वडिलांच्या आज्ञेचे पालन करा, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. महाविद्यालयाच्या नावलौकिक वाढविण्यात विद्यार्थ्यांच्या सिंहाचा वाटा आहे असे गौरवोद्गार काढले.

सकाळी सुरू झालेल्या रक्तदान शिबिर कार्यक्रमा प्रसंगी मान्यवरांनी शिबिरास भेट देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला व त्यांचा आत्मविश्वास वाढविला. महाविद्यालय करीत असलेल्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. सर्वोपचार रक्तपेढी, राष्ट्रीय सेवा योजना तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्यावतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. यामध्ये एकूण ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदानात रासेयो, एनसीसी, शा.शि. विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांनी प्रामुख्याने भाग घेतला. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. अर्चना सावरकर यांनी तर आभार डॉ. ए. जी. सरप यांनी मानले. शासनाने, विद्यापीठाने तसेच शिक्षण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करून कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. नानोटी यांचे मार्गदर्शनाखाली [illegible] यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---

## आरएलटी सायन्स ५; तर एलआरटी कॉमर्स कॉलेजला 3 पुरस्कार जाहीर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ; रासेयोचे पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी** | अकोला

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या राष्ट्रीय सेवा योजने द्वारे नुकतेच शैक्षणिक सत्र २०१९-२० करिता राष्ट्रीय सेवा योजनेचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

पुरस्कार प्राप्त महाविद्यालयांमध्ये दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित असणाऱ्या महाविद्यालयांना विविध पुरस्कार जाहीर झाले. यामध्ये श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाला पाच, श्रीमती लरातो वाणिज्य महाविद्यालयाला तीन व श्री कि.न.गोयनका कॉलेज, कारंजा येथील एक महाविद्यालयाला याप्रमाणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे पुरस्कार घोषित करण्यात आलेले आहेत.

यामध्ये श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाला विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट एकक महाविद्यालय पुरस्कार तसेच डॉ.रश्मी जोशी-सावलकर यांना विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय उत्कृष्ट महिला कार्यक्रम अधिकारी व प्रसाद कृष्णराव गुल्हाने यांना विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय उत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक असे एकूण पाच पुरस्कार जाहीर झाले. श्रीमती लरातो वाणिज्य महाविद्यालयाची सपना सुरेश बावर हिला विद्यापीठ व जिल्हास्तरीय उत्कृष्ट स्वयंसेविका त्याचप्रमाणे डॉ. आर.एल.येउल यांना उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजनेचे उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी जिल्हास्तरावर असे एकूण तीन पुरस्कार घोषित करण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर श्री कि.न.गोयनका महाविद्यालय, कारंजा येथील पूजा राजहंस खडसे या विद्यार्थिनीला उत्कृष्ट रासेयो स्वयंसेविका जिल्हास्तर घोषित करण्यात आलेला आहे. या संस्थे अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये नैपुण्य प्राप्त करून संत गाडगेबाबा विद्यापीठामध्ये आपला दबदबा कायम ठेवला आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या या पुरस्काराबद्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे, दि बीजीई संस्थेचे अध्यक्ष अॅड. मोतीसिंह मोहता, वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्ष डॉ.रविंद्र जैन, मानद सचिव पवन माहेश्वरी, सहसचिव इंजिनिअर अभिजित परांजपे, पदाधिकारी, सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी, प्राचार्य डॉ. श्रीप्रभु चापके, प्राचार्य डॉ. विनय कोडापे यांच्यासह समस्त प्राध्यापक, शैक्षणिक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या अनेक स्वयंसेवकाचे सर्वस्तरातून, पालकांमधून तसेच नागरिकांच्यावतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

---

## आरएलटी सायन्स कॉलेजला विद्यापीठाचे पाच पुरस्कार

### एलआरटी कॉमर्स महाविद्यालयाला तीन

**अकोला दि.१ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे रासेयोचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यामध्ये दी बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोलाद्वारा संचालित महाविद्यालयांना विविध पुरस्कार जाहीर झाले. यामध्ये श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाला पाच, श्रीमती लरातो वाणिज्य महाविद्यालयाला तीन व श्री कि.न.गोयनका कॉलेज, कारंजा यांना एक या प्रमाणे पुरस्कार घोषीत झाले.

श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाला विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट एकक महाविद्यालय पुरस्कार तसेच डॉ.रश्मी जोशी-सावलकर यांना विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय उत्कृष्ट महिला कार्यक्रम अधिकारी व प्रसाद कृष्णराव गुल्हाने यास विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय उत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक असे एकूण पाच पुरस्कार जाहीर झाले. श्रीमती लरातो वाणिज्य महाविद्यालयाची कु.सपना सुरेश बाबर हिला विद्यापीठ व जिल्हास्तरीय स्वयंसेविका. त्याचप्रमाणे डॉ. आर.एल.येउल यांना उत्कृष्ट रासेयो कार्यक्रम अधिकारी जिल्हास्तरावर असे एकूण तीन पुरस्कार घोषित झाले. श्री कि.न.गोयनका महाविद्यालय, कारंजा येथिल कु.पूजा राजहंस खडसे हिला उत्कृष्ट रासेयो स्वयंसेविका जिल्हास्तर घोषित झाला. संस्थे अंतर्गत महाविद्यालयांनी रासेयोमध्ये नैपुण्य प्राप्त करून विद्यापीठात आपला दबदबा कायम ठेवला.

# रासेयो विभागाच्या पुरस्कारांवर रा.ल.तो. महाविद्यालयाची मोहर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**अकोला :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे नुकतेच शैक्षणिक सत्र २०१९-२० पुरस्कार जाहीर करण्यात आले. यामध्ये दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयांचा दबदबा असून, तब्बल पाच पुरस्कारांवर श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यलयाने आपली मोहर उमटवली, तर श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यलयाला तीन व कारंजा येथील कि.न.गोयनका महाविद्यालयाला एक पुरस्कार घोषित करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महाविद्यालयांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाला विद्यपीठस्तरीय उत्कृष्ट एकक महाविद्यालय पुरस्कार, डॉ. रश्मी जोशी-सावलकर यांना विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय उत्कृष्ट महिला कार्यक्रम अधिकारी, प्रसाद कृष्णराव गुल्हाने यास विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय उत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक असे एकूण पाच पुरस्कार जाहीर झाले. श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालयाची सपना सुरेश बाबर हिला विद्यापीठ व जिल्हास्तरीय स्वयंसेविका, त्याचप्रमाणे डॉ. आर.एल. येऊल यांना उत्कृष्ट रासेयो कार्यक्रम अधिकारी जिल्हास्तरावर असे तीन पुरस्कार, तर कारंजा येथील कि.न.गोयनका महाविद्यालयातील पूजा राजहंस खडसे हिला उत्कृष्ट रासेयो स्वयंसेविका जिल्हास्तर पुरस्कार जाहीर झाले आहेत. या पुरस्काराबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे, बेरार संस्थेचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता आदींनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी, प्राचार्य डॉ.श्रीप्रभू चापके, प्राचार्य डॉ.विनय कोडापे यांचेसह रासेयो पथक, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांचे कौतुक केले.

# रस्ता सुरक्षा सप्ताहा निमित्त आरटीओ विभागाकडून पथनाट्य





**प्रतिनिधी** / ४ फेब्रुवारी

**अकोला :** ३२व्या रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत शहरातील मुख्य चौकामध्ये उपप्रादेशिक परिवहन कडून पथनाट्य चे आयोजन करण्यात आले . बेरार एज्युकेशन सोसायटीच्या आर एल टी महाविद्यालय आणि महाराष्ट्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय च्या वतीने पथनाट्य करून लोकां मध्ये जन जागृती करण्यात आली.

३२ व्या रस्ता सुरक्षा सप्ताह आणि दर रोज होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी व्हावे त्यासाठी वाहन चालवताना कुठं कुठले नियम आणि जवाबदारी ने वाहन चालवावी या उद्देशाने शहरातील बस स्थानक , खुल्य नाट्यगृह आणि जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विद्यार्थ्यांच्या मार्फत पथ नाट्य करण्यात आले. या पथनाट्यमध्ये ट्रिपल सीट वाहन , कमी वयात वाहन चालविणे , मधधुंद होऊन वाहन चालविल्याने अपघात होतात या गैरजवाबदारी ने जीवित हानी तर होतेच पण पारिवारिक नुकसान पण होते या विचार धारणेतून रस्त्यावर वाहन जवाबदारी आणि सुरक्षित चालवावी या प्रकारची जन जागृती पथ नात्याद्वारे करण्यात आली. या पथ नाट्य आयोजन उपप्रादेशिक परिवहन चे विनोद जिचकार यांच्या मार्गदर्शनात सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी गोपाल वरोकार ,मोटार वाहन निरीक्षक प्रफुल्ल मेश्राम , मोटार वाहक मोहम्मद अथर यांच्या साहाय्याने पथ नाट्य आयोजित करण्यात आले. स्क्रीप्ट बाय-अमिशा मिश्रा, इटिटींग- भुषण गवई, रुतूजा दांदले, वैष्णवी दांदले, रक्षा शर्मा, धनश्री असोलकर, सोनल गावंडे, निखील सावंत, शंतनू वावगे, हर्षल गीराम, उज्ज्वल पटेल, सौरभ गवली यांनी सादर केले.

आजचा अग्रलेख
आभासी प्रतिमा
(वाचा पान ४ वर)

paper www.janmadhyam.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती बुधवार २ डिसेंबर २०२० ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १०

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ रासेयो विभागा तर्फे घोषीत झालेल्या विविध पुरस्कारासाठी बी.जी.ई. संस्थे अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांची निवड

**आरएलटी सायंन्स कॉलेज ५ पुरस्कार, एलआरटी कॉमर्स कॉलेज ३ पुरस्कार, किसनलाल नथमल गोयनका. कॉलेज १ पुरस्कार**

[illegible]

# रालतो महाविद्यालयाच्या रासेयो पथकातर्फे वृक्षारोपण



वृक्षारोपण प्रसंगी उपस्थित रासेयो पथकाचे स्वयंसेवक.

**प्रतिनिधी । अकोला**

स्थानिक श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथक व वन विभाग अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच वृक्षारोपण कार्यक्रम राबवण्यात आला. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली रोसेयो स्वयंसेवक प्रसाद गुल्हाने, ऋतुजा गोपनारायण, साक्षी कोंडावार, उज्ज्वल पटेल या विद्यार्थ्यांनी वन विभागाच्या साह्याने मलकापूर जवळील शिवापूर येथे ३० रोपट्यांचे रोपण केले. यावेळी वन विभाग अधिकारी आबे, गोंदाने, गिते व इतरांनी मिळून वृक्षारोपण केले. कोरोनाची महामारी लक्षात घेऊन सोशल डिस्टंन्सींगचे पालन करून मास्क व सॅनिटायझरचा वापर करीत सुरक्षितता बाळगल्या गेली. यापूर्वी २ जुलै रोजी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दि. नानोटी, डॉ. रश्मी जोशी सावलकर, डॉ. समाधान मुंडे, प्रा. शैलेश जयस्वाल, प्रा. शैलजा अंधारे, प्रा. अल्का देशमुख उपस्थित होते. सदर कार्यक्रम रासेयो चमू व डॉ. विजय नानोटी यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला. डॉ. नानोटी यांनी याकरता वन विभागाचे सुध्दा आभार मानले.

दिव्य मराठी विशेष • कृषी सेवा केंद्राव

# <u>छायाचित्रे</u>



Lat N 20° 39' 20.583"
Long E 77° 3' 34.98084"
13/07/20 05:12 PM


Lat N 20° 39' 20.4408"
Long E 77° 3' 35.2548"
13/07/20 05:17 PM


Lat N 20° 39' 21.3372"
Long E 77° 3' 33.63876"
13/07/20 04:59 PM

दि. १३ ऑगस्ट २०२० ला निबंध स्पर्धा व पोस्टर स्पर्धेचे आयोजन

















**"गंदगी मुक्त मेरा गाव"** ह्या विषयावर पोस्टर स्पर्धेत बनविलेले विद्यार्थ्यांचे काही पोस्टर्स


SWACHH BHARAT
Black Money


HAPPY INDEPENDENCE DAY...
THEY STAY AT WORK FOR YOU.
STAY AT HOME FOR THEM.
Avoid Laege gatheeing and bike eallies on INDEPENDENCE DAY


TOILET
स्वच्छ भारत
DRINKING WATER
स्वच्छता अभियान
Z.P. SCHOOL


गन्दगी मुक्त मेरा गाँव !!!!
Cleaneliness is next to Godliness
सुनो गौर से भारतवासी,
मिली आजादी अच्छी खासी,
स्वच्छ और साफ बने भारत
I will initiate the quest for cleanliness with......
MYSELF
MY FAMILY
MY LOCALITY
MY VILLAGE
&
MY WORK PLACE
I believe that the countries of the world that appear clean are so because their citizens don't indulge in littering nor do they allow it to happen. With this firm belief, I will propagate the message of SWACHH BHARAT MISSION in Villages and Towns.




दत्तकग्राम, प्राथमिक स्वास्थ्य केंद्र आपातापा व ग्रामपंचायत आपातापा  येथे श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व स्वयंसेवकानकडून करोना पासून बचाव करण्याकरिता सेनिटाईझेषन करण्यात आले.




ग्रामपंचायतीतील परिसरात वृक्षारोपण करतांना रासेयो कार्य.अधि. डॉ. जोशी व ग्रा. पं. आपातापा चे प्रशासक श्री अन्कुरकर व उपसरपंच श्री उमेश बोपटे.







PHC येथे दत्तक ग्राम          उपसरपंच, डॉ. उमेश बोपटे,   .          PHC Incharge व रासेयो चमू







**दत्तक ग्राम येथे रोपट्यांचे वितरण केल्या गेले तसेच उपसरपंच डॉ. उमेश बोपटे, आपातापा ग्रामपंचायत चे प्रशासक श्री अन्कुरकर ह्याच्या उपस्थितीत वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित आयोजित करण्यात आला.**



रासेयो विभाग कडून महाविद्यालयातील परिसरात कोरोना महामारीपासून बचाव करण्याकरिता विद्यार्थी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता “sanitizer pedal stand” देण्यात आले.

Sensor based Machine hand Sanitization करिता.




**महाविद्यालात विविध ठिकाणी "NO MASK- NO ENTRY" चे फलक लावून प्रवेश द्वारावरच आत येतांना, प्रत्येकाला मास्क वापरणे बंधनकारक करण्यात आले.**


CCTV
Surveillance
विनम्र अभिवादन


**sanitizers** .


You Are Under
CCTV
Surveillance
College Administration Section
विनम्र अभिवादन


R.L.T. COLLEGE OF SCIENCE AKOLA
NAAC REACCREDITED GRADE "A"
WING C
Goals & Objectives



गुगल मीट वर MGNCRE ची एक दिवसीय आभासी कार्यशाळा NEP (National Education Policy)




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित
SHRI R.L.T. COLLEGE OF SCIENCE AKOLA
श्री रा.ल.तो.विज्ञान महाविद्यालय,अकोला
राष्ट्रीय सेवा योजना
राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME
DONATE BLOOD
रक्तदान - श्रेष्ठदान
संत गाडगे बाबा स्नेहानुबंध अभियान
गुरुवार, दि. २४ डिसेंबर २०२० वेळ : सकाळी ९ ते ११
स्थळ : महाविद्यालय सभागृह, सिव्हिल लाईन रोड, अकोला
महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये कोविड-१९ कोरोनाचा प्रादूर्भाव असल्यामुळे रक्ताचा तुटवडा मोठया प्रमाणात दिसून येत आहे. सामाजिक कर्तव्य आपल्याला पार पाडावयाचे आहे. कृपया सामाजिक अंतर (सोशल डिस्टन्सिंग) ठेवून रक्तदान करावे.
माझे कुटुंब
माझी जबाबदारी
SOCIAL DISTANCING
COVID-19
सुरक्षित अंतर ठेवा
स्वच्छ हात धुवा
गर्दी टाळा
डॉ. राजेश बुरंगे, संचालक,रा.से.यो., सं.गा.बा.अम.विद्यापीठ,अमरावती
प्रा.डॉ. रश्मी जोशी (सावलकर)
कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो.,
श्री रा.ल.तो.विज्ञान महाविद्यालय
प्रा. डॉ. समाधान मुंडे
कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो.,
श्री रा.ल.तो.विज्ञान महाविद्यालय
डॉ. सुधिर कोहचाळे
क्षेत्रिय समन्वयक,रा.से.यो.,
सं.गा.बा.अम.विद्यापीठ,अमरावती
डॉ. विजय नानोटी
प्राचार्य
श्री रा.ल.तो.विज्ञान महाविद्यालय

## The Berar General Education Society, Akola

### Executive Committee

| | | |
|---|---|---|
| 1. | Adv. Motisingh G. Mohta | President |
| 2. | Shri Vijaykumar S. Toshniwal | Sr. Vice President |
| 3. | Dr. Ravindra C. Jain | Jr. Vice President |
| 4. | Shri Pavan N. Maheshwari | Hon. Secretary |
| 5. | Er. Abhijeet G. Paranjape | Jt. Secretary |
| 6. | Adv. Pramod W. Agrawal | Executive Member |
| 7. | Ar. Atul R. Bang | Executive Member |
| 8. | Shri Abhay P. Bijwe | Executive Member |
| 9. | Shri Deepak B. Chandak | Executive Member |
| 10. | Shri Ramchandra S. Chandak | Executive Member |
| 11. | Shri Karan K. Cheema | Executive Member |
| 12. | CA Vikram R. Golechha | Executive Member |
| 13. | Adv. Ajaykumar R. Gupta | Executive Member |
| 14. | Dr. Ajay V. Kant | Executive Member |
| 15. | Dr. Kiran H. Laddha | Executive Member |
| 16. | Dr. Satish L. Rathi | Executive Member |
| 17. | Shri Amit A. Sureka | Executive Member |

# *Invitation*

Thursday, 24th December 2020

The Berar General Education Society's

## SHRI R.L.T. COLLEGE OF SCIENCE, AKOLA

(NAAC Reaccredited Grade 'A' with CGPA 3.12)

- Late Principal M.G. Joshi Memorial Day
  Blood Donation & Prize Distribution Programme
- Meeting of IQAC & Executive Members of Alumni

टिप : कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने शासनाने, विद्यापीठाने तसेच शिक्षण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून सदर कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

---

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित

## श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

(संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित)

### स्व. प्राचार्य म.गो. जोशी स्मृतिदिन

(रक्तदान शिबीर, पारितोषिक वितरण, आय.क्यु.ए.सी.
व माजी विद्यार्थी कार्यकारिणी सभा २०२०)



स्व. प्राचार्य म.गो. जोशी

महोदय/महोदया,

**रक्तदान शिबीर**

गुरुवार, दि. २४ डिसेंबर २०२० वेळ : सकाळी ९ ते ११

सौजन्य :
- रक्तपेढी विभाग, जिल्हा सामान्य रूग्णालय, अकोला
- सुक्ष्मजीवशास्त्र विभाग
- एन.एस.एस., एन.सी.सी., स्पोर्टस्, डी.एम.सी.

**विनित**

| | | |
|---|---|---|
| डॉ. विजय नानोटी<br>प्राचार्य<br>श्री रा.ल.तो. विज्ञान महा., अकोला | डॉ. राजेन्द्र रहाटगांवकर<br>डॉ. पूनम अग्रवाल<br>IQAC | श्री. चंद्रकांत अहिरकर<br>शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी |

व समस्त प्राध्यापक, शैक्षणिक, शिक्षकेत्तर व प्रशासकिय कर्मचारी

**रक्तदान शिबीर समिती**

| | | |
|---|---|---|
| डॉ. एस.आर. कोहचाळे | डॉ. आर.डी. चंद्रवंशी | डॉ. एच.एस. मालपाणी |
| डॉ. पी.आर. जोशी | डॉ. एस.एल. मुंडे | डॉ. आर.एम. अग्रवाल |
| प्रा. एस.एन. गवांदे | श्री. डी.जे. वानखडे | श्री. के.वाय. पाटील |

## अभिवादन, पारितोषिक वितरण, आय.क्यु.ए.सी. व माजी विद्यार्थी कार्यकारिणी सभा

गुरुवार, दि. २४ डिसेंबर २०२० वेळ : दुपारी १२ ते २ वा.

कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा.ॲड. मोतीसिंहजी मोहता,
अध्यक्ष, दि बी.जी.ई. सोसायटी, अकोला

विशेष उपस्थिती : मा.श्री. विजयकुमारजी तोष्णीवाल, वरिष्ठ उपाध्यक्ष
मा.डॉ. रविंद्रजी जैन, कनिष्ठ उपाध्यक्ष
मा.श्री. पवनजी माहेश्वरी, मानद् सचिव
मा.इंजि. अभिजीतजी परांजपे, सहसचिव

आणि समस्त कार्यकारिणी सदस्य,
दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला

**पारितोषिक वितरण समिती**

| | | |
|---|---|---|
| डॉ. आर.डी. चंद्रवंशी | डॉ. ए.एस. सावरकर | प्रा. पी.व्ही. गाडगे |
| प्रा. आर.डी. चौधरी | डॉ. ए.जी. सरप | प्रा.सौ. शैलजा अंधारे |
| प्रा. एस.व्ही. मडावी | प्रा. एस.सी. झायटे | श्री. व्ही.एस. अळणे |

**माजी विद्यार्थी समिती**

(F-20205)

| | | |
|---|---|---|
| श्री. दिपक दे. मायी<br>अध्यक्ष | श्री. प्रशांत सु. बुले<br>उपाध्यक्ष | प्रा. राजेश दे. चौधरी<br>सचिव |

## श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय
## राष्ट्रीय सेवा योजना

# NOT ME BUT YOU

"रस्ता सुरक्षा सप्ताह"

## सूचना

रासेयो च्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे कि, "रस्ता सुरक्षा सप्ताह" दर वर्षी जानेवारी महिन्यात साजरा केला जातो, पण २०२१ ला "रस्ता सुरक्षा महिना" (१८ जानेवारी ते १७ फेब्रुवारी) म्हणून साजरा करण्यात येणार आहे. श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथक आणि अकोला जिल्हा उप-परिवहन विभागाच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्यामधे,

१. पथनाट्या च्या माध्यमाने रासेयो चे विद्यार्थ्यांकडून विविध ठिकाणी जनजागृती पर कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे.

२. **Poster Competition** (रस्ता सुरक्षे बाबत संदेश देणारे असावेत. पोस्टर हा पूर्ण century पेपरवर असावा.)

३. **Quiz Competition** (प्रश्नमंजुषा हि सर्व विद्यार्थ्यां करिता असणार आहे. त्यामध्ये २० प्रश्न विचारण्यात येतील. प्रत्येक प्रश्नाला २ गुण देण्यात येतील.)

पोस्टर स्पर्धेत भाग घेणार्यांनी ०१/०२/२०२१ सकाळी ११ वाजे पर्यंत पोस्टर्स drrashmijoshi151@gmail.com ह्या mail id वर पाठविणे. Quiz Competition करिता लिंक उद्या दि. ३०/०१/२०२१ रोजी देण्यात येईल. दोन्ही स्पर्धेत उत्कृष्ट पहिले ३ विद्यार्थी निवडले जातील व त्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येतील. सर्व विद्यार्थ्यांनी ह्या स्पर्धेत भाग घेऊन जनजागृतीपर कार्यक्रमा मध्ये सहभाग करावे.


रासेयो कार्य. अधि.
डॉ. रश्मी जोशी सावळकर
डॉ. समाधान मुंडे
Mob. No.
[illegible] व
[illegible]

रासेयो सह. कार्य. अधि.
प्रा. शैलेश ठोसर
प्रा. सोनाली गवांदे



उद्घाटन सोहळ्यात दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष मा. Adv. मोतीसिंहजी मोहता, मानद सचिव मा. डॉ. पवनजी महेश्वरी, सहसचिव मा. श्री अभिजितजी परांजपे व इतर मान्यवर.




अध्यक्षीय भाषण देतांना प्राचार्य मा. डॉ. विजय नानोटी, डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे आणि अकोला GMC रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी श्री अनुप गोसावी, वैद्यकीय समुपदेशक तायडे मॅडम व इतर सहायक प्राध्यापक वृंद.



Blood transportation van सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. विजय नानोटी, क्षे. सम. डॉ. सुधीर कोहचाले, डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे व इतर सहायक प्राध्यापक वृंद.





रक्तदात्यांचे मनोबल वाढविण्याकरिता तसेच शिबीर यशस्वी करण्याकरिता प्रयत्नरत स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी.





रक्तदान शिबिराचे आयोजन, रासेयो विभाग आणि DMC च्या सौजन्याने व मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाने शिबीर यशस्वी झाले.





डॉ. कविता हेडा, सहा. प्रा. रसायन शास्त्र विभाग ह्यांनी रक्तदान केले, सोबत महिला शिक्षक वृंद, मा. प्राचार्य आणि रासेयो चे विद्यार्थी व डॉ. कोहचाले व डॉ. समाधान मुंडे.




**1. N.S.S. Unit of Shri R.L.T. College of Science, Akola was Award by University Level, Best N.S.S. Unit for the year 2019-20**




**2. Dr. Rashmi Joshi Sawalkar awarded as the Best N.S.S. Lady Programme Officer at University Level for the year 2019-20**





**3. University Level Best N.S.S. Volunteer Award (Male) for the year 2019-20 to Prasad Krushnarao Gulhane**




**4. Dr. Rashmi Joshi Sawalkar Awarded as District Level Best N.S.S. Lady Programme Officer for the year 2019-20**




5. **District Level Best N.S.S. Volunteer Award (Male) for the year 2019-20 to Prasad Krushnarao Gulhane**




**6. University Level Best N.S.S. College Award in Akola District for 2019-20 under Swaccha Bharat-Swastha Bharat Abhiyan.**




SEVEN SOCIAL SINS
WEALTH WITHOUT WORK
POLITICS WITHOUT PRINCIPLE
COMMERCE
EDUCATION
PLEASURE
SCIENCE
WORSHIP
Mission
To contribute to the society through the pursuit of education, learning and research at the highest level of

